# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.२२०४५६/२२/अ.क्र.४१९५-ए/२५/०१

**श्री. मिलिंद गंगाराम जाधव**
१४१, टेनामेंट महापाहिका वसाहत, चाळ नं.७,
रुम नं.७२-अे, गिता सिनेमासमोर,
डॉ. ई. मोझेस रोड, वरळी नाका, मुंबई-१८

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) मुख्यालय**
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य पर्यवेक्षक (घ.कव्य.) यांचे कार्यालय,
म.न.पा. खटाव मार्केट इमारत, ४था मजला, स्लेटर रोड, नौशिर भरुचा मार्ग,
ग्रँट रोड (प.) मुंबई – ४००००७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) मुख्यालय**
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य पर्यवेक्षक (घ.कव्य.) यांचे कार्यालय,
म.न.पा. खटाव मार्केट इमारत, ४था मजला, स्लेटर रोड, नौशिर भरुचा मार्ग,
ग्रँट रोड (प.) मुंबई – ४००००७

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.), श्री. प्रमोद मनोहर सांगळे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनूपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, जोडपत्र-अ मध्ये मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. मिलिंद जाधव यांनी दाखल केलेल्या दि.०८.०४.२०२२ रोजीच्या जोडपत्र-अ नुसार एकूण ५ मुद्द्यांची माहिती मागितली असून त्यातील माहितीचा कालावधी हा सन १९४७ ते दि.०१.०६.२००६ इतका असून यात अपिलार्थी श्री. जाधव व त्यांचे दिवंगत आई-वडील व अपिलार्थी यांच्या घरभाडे संदर्भातील माहिती मागितली असून त्यात मूळ माहिती अर्ज माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ यातील कलम ६(३) अन्वये प्रशासकीय अधिकारी (शहर), घनकचरा व्यवस्थापन यांच्याकडे अग्रेषित करण्यात आला होता. मात्र कुठलाही प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज व त्यानंतर द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून यात मागितलेली माहिती ही प्रदान करण्याची आग्रही विनंती केलेली आहे. अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ मधील माहितीचा कालावधी लक्षात घेता त्याची व्याप्ती व माहितीची क्लिष्टता लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) यांनी त्यांचे कार्यालयातील अभिलेखाचा कसून शोध घेत व त्यासाठी अपिलार्थी यांनीही पूर्ण सहकार्य देत उपरोक्त माहिती प्राप्त झाल्यास अपिलार्थी यांना १०० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra